**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे–४११ ००४**
(दूरध्वनी क्रमांक ०२० –२५६५८१३३)
**website :www.ebalbharati.in / www.balbharati.co.in**

दिनांक : २३.७.२०२४

**बालभारती मराठी इयत्ता पहिली या पाठ्यपुस्तकातील 'जंगलात ठरली मैफल' या गाण्याबाबत विविध माध्यमांतून येत असलेल्या बातम्या/प्रतिक्रियांबाबत खुलासा :–**

'जंगलात ठरली मैफल' हे गाणे पाठ्यक्रमानुसार बालभारती मराठी इयत्ता पहिलीच्या पाठ्यपुस्तकात शैक्षणिक वर्ष २०१८–२०१९ मध्ये प्रथम समाविष्ट करण्यात आले आहे. हे गाणे मुलांच्या भावविश्वाशी संबंधित आहे. सदर वयोगटातील विद्यार्थ्यांना प्राण्यांचे हावभाव व कृती करून हे गाणे अभिनय स्वरूपात म्हणता यावे, विद्यार्थ्यांचे श्रवण कौशल्य विकसित व्हावे, गाणे सहज व मनोरंजकपणे म्हणता यावे व विद्यार्थी त्यामध्ये समरस होऊन त्यांना या गाण्याचा आनंद घेता यावा, या दृष्टीने सदर गाण्याची निवड करण्यात आली आहे. गाण्यातील एक–दोन हिंदी व इंग्रजी शब्द हे यमक जुळवण्याच्या दृष्टीने वापरण्यात आलेले आहेत. प्रस्तुत गाण्यात चुकीचा मजकूर समाविष्ट नाही.

हे गाणे विद्यार्थ्यांचे भावविश्व आणि त्यांच्या वयानुसार रसग्रहण आणि अवधान वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. त्यामुळे या वयोगटाचा विचार करता मूळ कवितेत कुठलाही बदल न करता या गाण्याचा समावेश पाठ्यपुस्तकात करण्यात आलेला आहे. सदर गाणे हे प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांमार्फत चांगल्या पद्धतीने अभिनय करून विद्यार्थ्यांनी सादर करणे अपेक्षित आहे. त्यामुळे हे गीत विद्यार्थ्यांना आवडणारे आहे.

सदर पुस्तकातील या गाण्याबाबत गेल्या सात वर्षांत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचे निवेदन, सूचना पाठ्यपुस्तक मंडळास प्राप्त झालेली नाही. तसेच या पुस्तकाचे अधिप्रमाणन करते वर्षी देखील सदर गाण्याबाबत तज्ज्ञांनी बालभारतीला कोणतेही वेगळे मत वा भावना कळवलेल्या नाहीत. पाठ्यपुस्तकातील आशयाबाबत विविध लोकांच्या वेगवेगळ्या भावना/प्रतिक्रिया असू शकतात. परंतु समाजमाध्यमातून सदरबाबत संभ्रम वा विपर्यास करू नये असे सर्व संबंधितांना आवाहन करण्यात येत आहे.

23/7/2024

**(कृष्णकुमार पाटील)**
संचालक,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे